# जागतिक कॉमन्स सप्ताहाचे माध्यमातून सामूहिक वन हक्क धारक यांचे जाणीव जागृती कार्यक्रम

दै.सायरन/घाटंजी

यवतमाळ जिल्ह्यातील सामूहिक वन हक्क प्राप्त ग्रामसभा मध्ये फाउंडेशन फॉर इकॉलॉजिकल सिक्युरीटी,यवतमाळ आणि पार्टनर संस्था आयोजित जागतिक कॉमन्स सप्ताह चे आयोजन दिनांक 4, 5 आणि 6 डिसेंबर 2024 पासून करण्यात आले. या कॉमन्स सप्ताह मध्ये जगातील वेगवेगळ्या राज्यातून विविध समुदायातील प्रतिनिधि यांची ऑनलाइन बैठक आयोजित केली असून कॉमन्स वर आयोजित केलेला सप्ताह आणि संमेलन अशा विविध समुदयांना एका विचारमंचवर आणतो जे सामुदायिक, सामूहिक आणि नैसर्गिक साधन संपतीचे संरक्षण आणि संवर्धन करण्यात अग्रस्थानी आहेत. जेने करून ते एकत्र येऊन त्यांच्यात वैचारिक देवाण घेवाण होईल. तसेच सामाजिक दर्जा आणि



संधीची समानता विषयी एकमेकांचे अनुभव एका विचारमंचावर प्रकट करतील या ऑनलाइन बैठकीत नैसर्गिक साधन संपत्तीचे व्यवस्थापन संवर्धन आणि संगोपन, जैवविविधता, पानी, सुशासन, जमीन आणि साधन संपत्तीचे सुशासन, कॉमन्स जलवायू क्रिया,शहरी कॉमन्स,पशुपालन आणि शेती संबंध,कॉमन्स आणि उपजीविका इतर कल्याणकारी योजना,कॉमन्स आणि लिंग भेदभाव, कॉमन्स आणि संस्कृति, कॉमन्स संघर्ष आणि आव्हान इत्यादि बाबीवर चर्चासत्र,अनुभव कथन आणि यशोगाथा कार्य करीत असताना आलेली आव्हाने या बाबत ग्रामसभा मधील नागरिक यांनी संवाद साधत आहे.संवाद साधणारे नागरिक हे सर्व सामुहिक वन हक्क धारक आहेत.त्यांनी त्यांचे भाषेत आपले अनुभव कथन केले आहे. हे ऑनलाइन संमेलन आयोजित करण्यामागचा उद्देश देशातील सामुदायिक व सामूहिक साधन संपत्ति वर काम करणा ऱ्या विविध घटकांना एकत्र आणणे आहे.असे या वेळी त्रहएर यवतमाळचे जिल्हा समन्वयक गोविंद पेडणेकर यांनी माहिती दिली.त्याच प्रमाणे त्यांचे सहकारी विकेश आणि आनंद यांनी कॉमन्स म्हणजे अश्या जागा,संसाधने(जमीन, पानी, जंगल)आणि परंपरा ज्या समुदायाने सामूहिकरित्या समुदायाच्या फायद्याकरिता (उपजीविकासाठी, निवास करिता) व्यवस्थापित जतन आणि वापर केल्या आहे. त्यांचे वापर आणि स्वयंचलित व्यवस्थापन करिता एकत्रित येवून ठरविलेले नियम,शिस्त, सांस्कृतिक मानके विकसित करणे होय.नैसर्गिक संसाधने जसे की जमीन,पाणी,वन, सामुदायीक स्वयंपाकघर आणि ग्रामीण शहरी रस्ते,पानवठे पिण्याचे पानी असलेल्या जागा या सारख्या जागा पासून, सांस्कृतिक आणि पारंपरिक ज्ञानपद्धती पासून ते डिजिटल आणि इंटरनेट आधारित माहितीसह ही सर्व कॉमन्स उदाहरणे आहेत या विषयी माहिती दिली. तेव्हा दिनांक ४,५आणि ६ डिसेंबर २०२४ रोजी कृपया ऑनलाइन बैठक करिता आवश्यक साधन साहित्य टीव्ही, स्पीकर, इंटरनेट सुविधा आणि बैठक व्यवस्था ग्रामसभा स्तरावरून उपलब्ध करावे आणि सामूहिक वन हक्क प्राप्त ग्रामसभा मध्ये कॉमन्स वर संमेलन, २०२४ आयोजित करणेसाठी सर्व शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालय, ग्रामीण भागात कार्यरत सामाजिक संस्था,महिला बचत गट,कृषि गट,सामूहिक वन हक्क मध्ये कार्यरत सर्व समिती सदस्य यांनी सहभाग आणि सामीलकी नोंदवावी करिता या द्वारे आव्हान केले आहे. तेव्हा यवतमाळ जिल्ह्यातील सर्व गावात मोठ्या प्रमाणात जागतिक कॉमन्स आठवडा 4, 5 आणि 6 डिसेंबर 2024 रोजी साजरा करण्यात आला आहे. या माध्यमातून सामूहिक वन हक्क धारक यांना प्राप्त अधिकार आणि हक्क विषयी जाणीव जागृती होत आहे. या करिता कार्यरत सर्व फील्ड ट्रेनर आणि मास्टर ट्रेनर सर्व ग्रामसभा मध्ये कॉमन्स वीक साजरा करणे साठी प्रयत्न करीत आहेत. अश्या प्रकारे कॉमन्स वीक,( सप्ताह आठवडा) 2024 यवतमाळ जिल्ह्यात साजरा होत आहे.कृपया यवतमाळ जिल्ह्यात जागतिक कॉमन्स सप्ताहाचे माध्यमातून सामूहिक वन हक्क धारक यांचे करिता जाणीव जागृती कार्यक्रम मधे घाटंजी तालुक्यातील शाळा महाविद्यालय यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे ज्यात शि.प्र.म.विज्ञान व मिलानी कला वाणिज्य महाविद्यालय, शि.प्र.म कन्या शाळा,जिजाऊ आश्रम शाळा खापरी,जि प शाळा शिरोली जि प शाळा रामपूर, जि प शाळा घोटी,बाबासाहेब विद्यालय शिरोली,आदी शाळेचा शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सदस्य विद्यार्थी यांचा सहभाग होता.